# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे — ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:— "B.B.A. आणि B.C.A. या अभ्यासक्रमाच्या दुसरे आणि तिसरे वर्षाच्या शुल्क मंजुरीबाबत..."**

**संदर्भ :— मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे संदर्भ पत्र.क्र.महाडीबीटी—२०२४—२५ /शिष्यवृत्ती शाखा/८५३०, दि. २४/१२/२०२४.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे वरील संदर्भीय पत्रान्वये सन २०२४—२५ पासून B.B.A. आणि B.C.A. हे अभ्यासक्रम AICTE कडे वळती झाल्यामुळे ज्या महाविद्यालयांनी यापूर्वी महाडीबीटी पोर्टलवर B.B.A. आणि B.C.A. या अभ्यासक्रमाचे शुल्क मंजूरीकरिता पाठविले आहे अशा महाविद्यालयांनी फक्त व्दितीय व तृतीय वर्षाचे विद्यापीठाने निर्धारित केलेले शुल्क मंजूरीकरिता पाठवावे. तसेच ज्या महाविद्यालयांनी पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षाचे शुल्क मंजूरीस्तव पाठविले आहे. अशा महाविद्यालयांनी तीनही वर्षाचे शुल्क रद्द (Reject) करून घ्यावे व त्यानंतरच दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे शुल्क मंजूरीस्तव पाठविण्यात यावे असे कळविले आहे. (सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.)

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी वरील संदर्भीय पत्रानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

गणेशखिंड पुणे — ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/४९५९ }
दिनांक : ३०/१२/२०२४ }

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**
मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

महाराष्ट्र शासन
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. महाडीबीटी-२०२४-२५/शिष्यवृत्ती शाखा/ 1420 दिनांक : २४.१२.२०२४

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - BBA आणि BCA दुसरे आणि तिसरे वर्ष शुल्क मंजूरीबाबत..**

संदर्भ : - मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं- शिष्य/BBA-BCA/२०२४/७३०९५८ दि. २१.१२.२०२४.

उपरोक्त विषयाबाबत सादर करण्यात येते की, सन २०२४-२५ पासून BBA आणि BCA हे अभ्यासक्रम AICTE कडे वळती झाल्यामुळे अभ्यासक्रमातील द्वितीय व तृतीय वर्षाचे शुल्क सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडून तपासणी करुन मंजूर करण्यात यावे किंवा कसे याबाबत मा. संचालनालयाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते.

यास अनुसरुन BBA आणि BCA या अभ्यासक्रमासाठी नुतनीकरण आवेदन पत्र असल्याने व मूळ आवेदन (पहिले वर्ष - FRESH आवेदन पत्र बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम स्वरुप असल्याने) BBA आणि BCA दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे मंजूरीसाठी उच्च शिक्षण मार्फत करण्याबाबत मा. संचालनालयाने संदर्भांकित दि. २१.१२.२०२४ च्या पत्रामार्फत कळविले आहे. तरी ज्या महाविद्यालयांनी BBA आणि BCA हे अभ्यासक्रम AICTE कडे वळती करुन न घेता त्या अभ्यासक्रमांचे शुल्क महाडीबीटी पोर्टलवर मंजूरीकरीता पाठविले आहे. अशा सर्व महाविद्यालयांनी कृपया फक्त दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षाचे विद्यापीठाने निर्धारित केलेले सन २०२४-२५ चे BBA आणि BCA या अभ्यासक्रमाचे शुल्क मंजूरीकरीता पाठवावे. **तसेच ज्या महाविद्यालयांनी पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षाचे शुल्क मंजूरीस्तव पाठविले आहे. अशा महाविद्यालयांचे तीनही वर्षांचे शुल्क या कार्यालयाकडून रद्द / रिजेक्ट करुन**

ऊन फक्त दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षाचे शुल्क मंजूरीस्तव पाठविण्यात यावे. जेणेकरुन सन २०२४-२५ चे **BBA आणि BCA या अभ्यासक्रमाची दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षाची अचूक शुल्क मंजूरी करण्यात येईल.**

तसेच सन २०२४-२५ पासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी दि. २४.५.२०२४ आणि दि. ०४.०६.२०२४ रोजी परिपत्रक काढून B.B.A. C.A., B.B.A. I.B., B.C.A. COMMERCE या अभ्यासक्रमांचे नॉमीनक्लेचर पुढीलप्रमाणे बदलले आहेत.

| अ.क्र. | अभ्यासक्रम नाव | अभ्यासक्रमाचे नवीन नाव |
|---|---|---|
| १ | Bachelor of Business Administration B.B.A. | Bachelor of Commerce in Business Management - B. Com. (B.M.) |
| २ | Bachelor of Business Administration In International Business B.B.A. (I.B.) | Bachelor of Commerce in International Business B. Com. (I.B.) |
| ३ | Bachelor of Business Administration In Computer Aplication B.B.A. (C.A.) | Bachelor of Commerce in Computer Aplication B. Com. (C.A.) |
| ४. | Bachelor of Computer Aplication | B. Sc. Computer Aplication |

अशा महाविद्यालयांचे महाडीबीटी पोर्टल वर खाली नवीन नॉमीनक्लेचर असलेल्या अभ्यासक्रमांचे शुल्क मंजूरीबाबत मा. संचालनालयाकडून मार्गदर्शन मागविले आहे. सदर अभ्यासक्रमाबाबत सविस्तर मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर नवीन नॉमीनक्लेचर असलेल्या अभ्यासक्रमांच्या शुल्क मंजूरीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल याची उपरोक्त नमूद नवीन नॉमीनक्लेचरचे अभ्यासक्रम असलेल्या सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे